# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१

**E-mail :-** desk5@dte.org.in **Web :-** http://www.dte.org.in


अतितात्काळ

क्रमांक : ५(३)/एआयसीटीई/वेनि/२०११/१२१६
दिनांक : १० जानेवारी, २०११

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
पुणे

**विषय :- तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थांमधील शिक्षकीय पदांना ६ वा वेतन आयोग लागू करण्यांबाबत.**

संदर्भ : १) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक एसपीसी २०१०/(३४/१०)/ तांशि-२, दिनांक २० ऑगस्ट, २०१०
२) या कार्यालयाचे कार्यालयीन आदेश क्र.५(३)/एआयसीटीई/वेनि/२०१०/३३५७० दि. २० ऑक्टोबर, २०१०
३) या कार्यालयाचे कार्यालयीन आदेश क्र.५(३)/एआयसीटीई/वेनि/२०१०/५३३११ दि. १३ डिसेंबर, २०१०

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ च्या शासन निर्णयान्वये शासकीय तथा अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये तसेच तंत्रनिकेतने व तत्सम संस्थांतील शिक्षक व ग्रंथपाल यांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने लागू केलेली सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आलेली आहे. तसेच सदरच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ६(दोन) मध्ये संचालक, तंत्र शिक्षण यांनी सदरच्या वेतननिश्चितीची पडताळणी करुन संबंधितांच्या सेवापुस्तकात तशा नोंदी करण्यासाठी अधिकाऱ्यांना प्राधिकृत करण्याच्या सूचना देण्यांत आलेल्या आहेत. सदरच्या तरतूदीनुसार उपरोक्त संदर्भ क्रमांक २ च्या आदेशान्वये संचालक, तंत्र शिक्षण यांनी संबंधित विभागीय कार्यालयांच्या सहसंचालकांना त्यांच्या विभागातील शासकीय तथा अशासकीय अनुदानित पदवी तथा पदविका संस्थातील शिक्षक/ग्रंथपाल यांना लागू करण्यांत आलेल्या अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने शिफारस केलेल्या सुधारित वेतनश्रेणीतील वेतननिश्चितीची पडताळणी करुन संबंधितांच्या सेवापुस्तकात नोंद घेण्यासाठी प्राधिकृत केले होते. परंतु विभागीय सहसंचालकांनी केलेल्या संबंधित शिक्षकांच्या वेतननिश्चितीत तफावत आढळून आल्यामुळे, विभागीय कार्यालयाने केलेल्या वेतननिश्चितीची पडताळणी करण्याकरीता संदर्भ क्र.३ च्या आदेशान्वये संचालनालयाच्या स्तरावर समिती गठीत करण्यांत आली आहे.

तरी आपणांस कळविण्यांत येते की, आपण आपल्या विभागातील सर्व शासकीय संस्थांना शिक्षकीय पदांच्या वेतननिश्चितीची पडताळणी करण्याकरीता संस्थेतील जबाबदार अधिकारी तसेच संबंधीत कर्मचारी यांसह दिनांक **१७ ते १९ जानेवारी २०११** रोजी सकाळी ठिक १०.०० वाजता संचालनालयात सेवापुस्तकासह व वेतननिश्चितीशी संबंधीत सर्व कागदापत्रासह उपस्थित राहण्याच्या सूचना द्याव्यात. तसेच दि.१.१.२००६ नंतर ज्या अध्यापकांना नवीन वेतनसरंचनेनुसार वाढीव वेतनाचे लाभ देय होत आहेत. त्यानुषंगाने शिक्षकांनी पूर्ण केलेल्या प्रशिक्षण/उजळणी वर्गाची कागदपत्रे, प्रपत्र, प्रमाणपत्रे तसेच त्यांच्या गोपनीय अहवालाची प्रतवारी इ. कागदपत्रे तपासणीच्या वेळेस उपलब्ध करुन

देण्यांत यावीत. तसेच उपरोक्त नमुद कालावधीत एखादी संस्था पडताळणी करीता गैरहजर राहील्यास याची सर्वस्वी जबाबदारी विभागीय प्रमुख म्हणून आपल्यावर राहील.

(डॉ. सु. का. महाजन)
प्र. संचालक, तंत्र शिक्षण,
म.रा. मुंबई

प्रत,

१. मा.सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना माहितीसाठी.

२. प्राचार्य, सर्व शासकीय पदवी व पदविका संस्था (फक्त विभागीय कार्यालय पुणे अंतर्गत येणा-या संस्था). त्यांना सूचना देण्यांत येतात की, आपल्या संस्थेतील सर्व शिक्षकांच्या वेतननिश्चितीच्या पडताळणी करीता पत्रात नमुद केलेल्या सूचनांप्रमाणे या संचालनालयात हजर राहावे.

जा.क्रं.विकापु/आस्था/२०१०/ २५२

**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे**
दिनांक : ११ जानेवारी २०११ 11 JAN 2011

प्रतलिपी सर्व प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये/ तंत्रनिकेतने व तत्सम पदवी व पदविका संस्था

त्यांना कळविण्यात येते की, वर पत्रात नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करुन आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह खाली नमूद केलेल्या दिनांकास संस्थेतील जबाबदार अधिकारी व सबंधित कर्मचारी यांनी तंत्रशिक्षण संचालनालयात सकाळी १० वाजता उपस्थित रहावे.

| अ.क्रं. | दिनांक | हजर रहावयाच्या संस्थेचे नाव |
|---|---|---|
| ०१ | १७.०१.२०११ | शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय कराड<br>शासकीय अभियांत्रिकी व संशोधन संस्था अवसरी<br>शासकीय तंत्रनिकेतन पुणे/अवसरी/कराड , शासकीय दूरशिक्षण तंत्रनिकेतन पुणे<br>म.रा.हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड केटरिंग टेक्नॉलॉली पुणे, तंत्रशिक्षण परिक्षा मंडळ पुणे<br>तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे |
| ०२ | १८.०१.२०११ | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय कराड,<br>शासकीय तंत्रनिकेतन मिरज/तासंगाव/कोल्हापूर/सोलापूर |
| ०३ | १९.०१.२०१० | अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे |

तसेच दिनांक १.१.२००६ नंतर ज्या अध्यापकांना नवीन वेतनसंरचनेनुसार वाढीव वेतनाचे लाभ देय आहेत. त्या अनुषंगाने शिक्षकांनी पूर्ण केलेल्या प्रशिक्षण/उजळणी वर्गाची कागदपत्रे , प्रमाणपत्रे तसेच त्यांच्या मागिल ५ वर्षाची गोपनिय अहवालाची (संस्थास्तरावरील) प्रतवारी इत्यादी कागदपत्रे तपासणीच्या वेळेस उपलब्ध करुन द्यावीत. उजळणी वर्गाची माहिती संचालक तंत्रशिक्षण मुंबई यांचे पत्र पत्र क्रं. ४/(३)/आस्था/२०१०/३२८ दिनांक २०/१२/२०१० सोबत जोडण्यात आलेल्या प्रपत्र अ मध्ये सादर करण्यात यावी.

(डी.एन.शिंगाडे)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे

१) प्रोग्रॅमर तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी

D:\Desk-5\Mali\Mali-letter-2011.doc